IJARSCT
ISSN: 2581-9429
International Journal of Advanced Research in Science, Communication and Technology
International Open-Access, Double-Blind, Peer-Reviewed, Refereed, Multidisciplinary Online Journal
Volume 5, Issue 4, November 2025
Impact Factor: 7.67

# चार्वाक दर्शनातील मोक्ष संकल्पना

**डॉ. गोरोबा तुकाराम खुरपे**

प्राचार्य, कला व वाणिज्य महाविद्यालय, मायणी, ता. खटाव जि. सातारा

gtkhurpe@gmail.com

**सारांश** : चार्वाक दर्शन हे प्राचीन भारतीय भौतिकवादी आणि नास्तिक विचारधारा आहे, ज्यात मोक्ष ही संकल्पना पारंपरिक अर्थाने नाकारली जाते. हे दर्शन प्रत्यक्ष प्रमाणावर आधारित असून, आत्मा, पुनर्जन्म आणि अलौकिक मुक्ती यांना नाकारते. मानवी जीवनात दु:खे कमी करून जास्तीत जास्त सुख कसे मिळवायचे ही माणसाच्या कौशल्याची, शहाणपणाची आणि विवेकशीलतेची बाब आहे. ही बाब चार्वाक उदाहरण देऊन स्पष्ट करतात - साळीवरचा तूस काढून आतला तांदूळ खावा, काटा काढून मासा खावा आणि तांदळावर तूस आहे म्हणून तांदूळ ताज्य, काटा आहे म्हणून मासा वाईट हा निव्वळ आडाणीपणा आहे. चार्वाकेतर विचारवंत जीवन हे केवळ दुख:मय मानतात मात्र चार्वाक मानवी जीवन हे सुख-दुख मिश्रित मानतात. जन्म मरणाच्या फेऱ्यातून चार्वाकांनी प्रथमच सोडवून घेतले आहे, त्यांच्या प्रत्यक्ष प्रमाणावर आणि प्रत्यक्षनिष्ठ अनुमानावर आधारलेल्या तर्कशास्त्रात पुर्वजन्म आणि पुनर्जन्म बसत नाही. प्राचीन तत्वज्ञांनी जे पुरुषार्थ सांगितले आहेत त्यात सर्वात श्रेष्ठ पुरुषार्थ म्हणजे मोक्ष होय. मोक्ष म्हणजे मृत्यू किंवा स्वातंत्र्यपूर्ण जीवन असा अर्थ लावला जातो, परंतु चार्वाक तो पुरुषार्थ म्हणून मानत नाहीत प्राचीन भारतीयांना जी मुक्ती/मोक्ष अभिप्रेत होती तिचे स्वरूप आध्यात्मिक होते. मोक्ष म्हणजे उच्चतम ध्येय किंवा पुनर्जन्मापासून मुक्ती हे चार्वाकांना मान्य नाही तर त्यांच्या मते स्वातंत्र्य म्हणजे मोक्ष आणि परतंत्र हेच बंधन अशी विचारसरणी होती अर्थात

IJARSCT
International Journal of Advanced Research in Science, Communication and Technology
International Open-Access, Double-Blind, Peer-Reviewed, Refereed, Multidisciplinary Online Journal
ISSN: 2581-9429
Volume 5, Issue 4, November 2025
Impact Factor: 7.67

कुठल्याही प्रकारची परतंत्र्यता हे बंधन आणि माणसाला आपल्या इच्छा – आकांक्षाच्या जगण्याची परिस्थिती हेच स्वातंत्र्य, हीच ती अतिउच्च सुखावस्था, हाच परमानंद, हेच उच्चतम ध्येय आणि हाच 'मोक्ष' होय. मोक्षाचा केवळ भौतिक आणि भौतिक जीवनाशीच संबंध असा अर्थ चार्वाकांनी दिला आहे.

**मुख्य संज्ञा** : मोक्ष, पुरुषार्थ, नास्तिक विचारधारा, सुखावस्था, प्रत्यक्षनिष्ठ अनुमान, परमानंद इत्यादी